Enviornment

Con. 5244-10. NON

(REVISED COURSE)

Sem - II

**AM-5238**

(3 Hours)

[ **Total Marks : 100**

1. Answer the following : [not more than **two** sentences] 20
   - (a) What is Environment Impact Assessment ?
   - (b) Explain Power to give Directions u/s. 5 the Environment Protection Act.
   - (c) Define "Trophy" as defined under the Wildlife Protection Act.
   - (d) Define 'Air Pollutant' as defined under the Air Act.
   - (e) What is Bio-Medical Waste ?
   - (f) Who is an 'Occupier' under the Hazardous Waste Rules ?
   - (g) Under Water Act who can take cognizance of offence and how ?
   - (h) What is Global Warming ?
   - (i) Explain "Protection of Action taken in good faith', under the Air Act.
   - (j) What is the object behind the National Environment Tribunal Act, 1995.

2. Write Short Notes on the following : [Any **four**] :— 20
   - (a) Noise Pollution Rules
   - (b) Stockholm Conference
   - (c) Ecomark
   - (d) Air Pollution Control Areas as declared under the Air Act
   - (e) Sustainable Development
   - (f) 'Hunting' under Wildlife Protection Act.

3. Solve the following : [Any **two**] — 12
   - (a) Bulgaon Cottons Ltd. is a Limited Company in a populated town of Bulgaon. The residents made a complaint to the State Board that the industry was emitting toxic gases, particulate matter and dark smoke thereby endangering their lives.
     - (i) Does the industry require any consent from the Pollution Control Board ? Explain.
     - (ii) Briefly discuss the procedure for sampling under the Air Act.
   - (b) Huge quantities of Hazardous Wastes are generated by various industries. Repeated exposure to such wastes could have irreversible effects on nervous systems particularly in children. Industries can reduce hazardous wastes by controlling materials used in manufacturing process. Before purchase, production materials can be checked for hazardous constituents and whether a non hazardous substance is available.
     - (i) Which is the Legislation which could be made applicable to the industries which are generating hazardous Waste? Which Wastes are not covered under this Legislation ?
     - (ii) What are the provisions regarding import of such hazardous Wastes ?
   - (c) Upon a complaint reached from an NGO about an hazardous industry polluting the environment, the Central Government empowered an officer to carry out necessary investigations.
     - (i) What does "Handling" mean under the Environment Protection Act ? Is the, Act applicable to whole of India ?
     - (ii) Explain 'offences by Companies' under the Environment Protection Act.

[ **TURN OVER**

4. Answer the following : [Any **four**] 48
   - (a) Discuss the Powers of Central Government to take measures to protect and improve the Environment.
   - (b) "The Indian Constitution is one of the Law constitutions in the world having special provisions for Environmental Conservations". Discuss.
   - (c) Explain the Provisions for Environment Protection under General Laws.
   - (d) Discuss the different Penal Provisions under the Water Act, 1974.
   - (e) Give the classifications of Coastal Regulation Zone and which are the activities declared as 'Prohibited' under the regulations.
   - (f) Discuss "Public Interest Litigation" as an instrument for the Protection of Environment.

---

**(मराठी रूपांतर)**

१. खालील उत्तरे द्या (**दोन वाक्याहून अधिक नको.**) २०
   - (अ) पर्यावरण परिणाम निर्धारण म्हणजे काय ?
   - (ब) पर्यावरण संरक्षण कायद्याच्या कलम ५ नुसार निर्देश देण्याचा हक्क स्पष्ट करा.
   - (क) वन्यजीवन कायद्यांतर्गत 'ट्रॉफी'ची व्याख्या द्या.
   - (ड) वायु कायद्यांतर्गत 'वायु प्रदुषके'ची व्याख्या द्या.
   - (इ) जीव-वैद्यक कचरा म्हणजे काय ?
   - (फ) अपायकारक कचरा नियमावलीनुसार 'ऑक्युपायर' म्हणजे काय ?
   - (ग) जल कायद्याखाली गुन्ह्याची दखल कोण व कशी घेऊ शकते ?
   - (ह) वैश्विक तापमानवृद्धी म्हणजे काय ?
   - (स) वायु कायद्यांतर्गत 'उत्तम विश्वासाबरहुकूम घेतलेल्या (केलेल्या) कृत्याचे संरक्षण' म्हणजे काय ते स्पष्ट करा.
   - (द) राष्ट्रीय पर्यावरण आयोग कायदा, १९९५ चा हेतू काय आहे ?

२. खालीलपैकी संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही **चार**) :— २०
   - (अ) ध्वनीप्रदूषण नियमावली
   - (ब) स्टॉकहोम् परिषद
   - (क) इकोमार्क
   - (ड) वायु कायद्याखाली घोषित केलेली वायुप्रदुषण नियंत्रण क्षेत्रे
   - (इ) सस्टेनेबल डेव्हलपमेंट
   - (फ) वन्यजीवन संरक्षण कायद्यांतर्गत 'शिकार'.

३. खालील प्रश्न सोडवा (कोणतेही **दोन**) :— १२

(अ) 'बुलगाव कॉटन लिमिटेड' ही मर्यादित कंपनी भरपूर लोकसंख्या असलेल्या बुलगाव या शहरात आहे. रहिवाशांनी सदर कंपनीच्या कारखान्यातून काही विशिष्ट द्रव्ये, हानिकारक वायू व गडद धूर उत्सर्जनामुळे त्यांच्या जीवांना धोका पोहचत असल्याची तक्रार राज्याच्या बोर्डास केली आहे.

(१) प्रदुषण नियंत्रण मंडळाची (बोर्ड) कोणतीही परवानगी/मंजुरी सदर कारखान्याला आवश्यक आहे का ? स्पष्ट करा.

(२) वायु कायद्याखालील पृथक्करणाची पद्धत थोडक्यात सांगा.

(ब) बऱ्याच कारखान्यांतून हानीकारक कचरा मोठ्या प्रमाणात तयार होतो. त्याच्या वारंवार होणाऱ्या संपर्काने मज्जासंस्थेवर, व विशेषतः लहान मुलांच्याबाबतीत अयोग्य परिणाम होतात. उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये हानीकारक घटक पदार्थांच्या वापरावर नियंत्रण ठेवणे कारखान्यांना शक्य आहे. खरेदीपूर्वी काही अपायकारक नसलेले (पर्यायी) पदार्थ आहेत किंवा कसे तसेच सदर उत्पादकांच्यांत अपायकारक (हानीकारक) घटकांच्या बाबतीत तपासणे शक्य असते.

(१) हानीकारक कचरा उत्सर्जन करणाऱ्या कारखान्यांबाबत कोणत्या प्रकारचा कायदा लागू होतो ? कोणत्या प्रकारचा कचरा सदर कायदा/नियमावलीमध्ये मोडत नाही.

(२) हानीकारक कचऱ्याची आयात करताना कोणत्या तरतूदी लागू होतात ?

(क) हानीकारक कारखाना पर्यावरण दूषित करत असल्याची तक्रार एका एन्.जी.ओ. (बिनसरकारी संघटना) तर्फे पोहोचल्यावर, केंद्र सरकारने आवश्यक चौकशीसाठी एका अधिकाऱ्याची नेमणूक केली.

(१) पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत 'हाताळणी (हँडलिंग) म्हणजे काय ? सदर कायदा संपूर्ण भारताला लागू होतो काय ?

(२) पर्यावरण संरक्षण कायद्यात 'कंपनीने केलेले गुन्हे' हे स्पष्ट करा.

४. खालील प्रश्नांची उत्तरे द्या (कोणतेही **चार**) :— ४८

(अ) पर्यावरण संरक्षण व संवर्धन करण्यासाठी व पावले उचलण्यासाठी केंद्र सरकारला असणारे अधिकार याबाबत चर्चा करा.

(ब) ''भारतीय राज्यघटना ही पर्यावरण संवर्धनासाठी खास तरतूदी असणारी जगातील एक कायदे घटना आहे'' याचा उहापोह करा.

(क) सर्वसाधारण कायद्यांतील पर्यावरण संरक्षण तरतूदी स्पष्ट करा.

(ड) जल कायदा, १९७४ अंतर्गत असणाऱ्या दंडात्मक तरतूदींचे विश्लेषण करा.

(इ) समुद्रतटीय विनिमय क्षेत्र (सी.आर.झेड.) चे वर्गीकरण द्या आणि सदर विनियमांतर्गत कोणत्या प्रकारची कार्ये प्रतिबंधित म्हणून घोषित केली आहेत ते सांगा.

(फ) पर्यावरण संरक्षणाचे 'जनयाचिका' हे एक साधन आहे याची चर्चा करा.

---